# पुणे विद्यापीठ
## गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

संदर्भ :– परीक्षा / वाणिज्य / ५०५३ दिनांक : २९/०७/२०११

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य (एम.कॉम.) महाविद्यालये,

**विषय :–** एम.कॉम. (सेमिस्टर – २ आणि ४) एप्रिल २०११
परीक्षेच्या निकालाबाबत...

महोदय / महोदया,

एम.कॉम. (सेमिस्टर – २ आणि ४) २००८ व २००२ पॅटर्न एप्रिल २०११ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक २९/०७/२०११ रोजी दुपारी ४.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येतील.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल दिनांक २९/०७/२०११ रोजी दुपारी 2.०० ते दुपारी 3.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून दिनांक २९/०७/२०११ रोजी दुपारी 2.०० ते 3.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहे.

३. महाविद्यालयांना परीक्षेच्या निकालाचे लेजर देण्याऐवजी त्या लेजरची सी.डी. सोबत देण्यात येत आहे. त्याच्या Print out काढाव्यात.

आपल्या महविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्याला परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१. मा. उपकुलसचिव, (परीक्षा २)
२. मा. सर्व सहायक कुलसचिव, (परीक्षा)
३. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक व अहमदनगर